आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ नोव्हेंबर २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला प्रारंभ / भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार बहुतांश ठिकाणी आघाडीवर

- वित्तीय समावेशन आणि सामाजिक सुरक्षा योजनांच्या राष्ट्रव्यापी अंमलबजावणी अभियानात महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर

- घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याच्या दरात ऑक्टोबर महिन्यात घट

- पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव १५९ धावात गुंडाळला

**आणि**

- प्रसिद्ध अभिनेत्री कामिनी कौशल यांचं निधन

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला आज सकाळी सुरुवात झाली. सुरुवातीला मिळालेले कल पाहता भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार बहुतांश जागांवर प्रतिस्पर्धी उमेदवारांपेक्षा आघाडीवर आहेत. ऐकूया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - व्हॉईस कास्ट- - -**

*(भारतीय जनता पार्टी सर्वात जास्त* ***९२*** *जागी आघाडीवर आहे.*
*त्याखालोखाल जनता दल संयुक्त* ***८१*** *ठिकाणी आघाडीवर आहे.*
*चिराग पासवान यांचा लोकजनशक्ती पक्ष* ***२१*** *मतदारसंघात आघाडीवर आहे.*
*महाविकासआघाडीतला*
*राष्ट्रीय जनता दल पक्ष* ***२६*** *ठिकाणी आघाडीवर आहे.*
*भारतीय कम्युनिस्ट पार्टी लेनिनवादी चे उमेदवार* ***१*** *ठिकाणी तर*
*काँग्रेसचे उमेदवार* ***४*** *ठिकाणी आघाडीवर आहेत.*

*विद्यमान उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, तारापूर मतदारसंघात आघाडीवर आहेत तर राजद नेते तेजस्वी यादव राघोपूरमधे चुरशीची लढत देत आहेत.*

*बिहारमधे राष्ट्रीय लोकशाही आघाडीला यश मिळत असल्याबद्दल मुंबईच्या भाजपा मुख्यालयात आनंदोत्सव सुरु आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येनं त्यात सहभागी झाले आहेत.)*

**<><><><><>**

देशात इतर ६ राज्यातल्या प्रत्येकी एका मतदारसंघातल्या तसंच जम्मू आणि काश्मीरमधल्या २ मतदारसंघात झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी देखील सुरु आहे.

**जम्मूकाश्मीर**मधल्या नागरोटा मतदारसंघात भाजपाच्या देवयानी राणा निवडून आल्या आहेत. त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी जम्मू काश्मीर नॅशनल पँथर्स पार्टीचे हर्ष देव सिंग यांचा त्यांनी २४ हजार ६४७ मतांनी पराभव केला.

**मिझोरम**मधे मिझो नॅशनल फ्रंटचे डॉ. आर लालथंगलियाना निवडून आले आहेत. झोराम पीपल्स मूव्हमेंटचे वनलाल सैलोवा यांना त्यांनी ५६२ मतांनी हरवलं.

**राजस्थाना**तल्या अंता मतदारसंघात काँग्रेस उमेदवार प्रमोद जैन भाया विजयी झाले आहेत.

**पंजाब**च्या तरणतारण मतदारसंघात आम आदमी पार्टीचे हरमीत सिंग संधू विजयी झाले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या गुजरातच्या दौऱ्यावर जाणार आहेत. देदीपाडा इथं धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते ९ हजार ७०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध विकास कामांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील. या दौऱ्यात ते सुरतमधल्या बुलेट ट्रेन स्थानकाच्या बांधकामाची पाहणी करतील.

**<><><><><>**

क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या दिडशेव्या जयंतीनिमित्त नागपूर इथं उद्यापासून १७ नोव्हेंबर पर्यंत भव्य जनजातीय गौरव महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या राज्यपातळीवरच्या महोत्सवाचं उद्घाटन राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते होणार आहे.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ऊईके यांनी नागपूर इथं ही माहिती दिली. याचबरोबर राज्यातल्या सुमारे चार हजार ९७५ आदिवासी गावांमध्ये शासनाच्या सर्व विभागामार्फत समग्र विकासासाठी एक व्यापक मोहीम राबवली जात असल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांना समाजमाध्यमावर अभिवादन केलं आहे. जवाहरलाल नेहरू यांच्या १३६व्या जयंतीनिमित्त नवी दिल्लीतल्या त्यांच्या शांतिवन समाधीस्थळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या नेत्या  सोनिया गांधी, आणि इतर ज्येष्ठ नेत्यांनी आदरांजली वाहिली.

आजचा दिवस ‘बाल दिन’ म्हणून साजरा केला जातो, त्या निमित्त आज देशभर विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती भवनातल्या कल्चरल सेंटरमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विविध शाळा आणि संस्थांमधल्या बालकांशी संवाद साधला.

साहित्य अकादमी -बाल साहित्य पुरस्कार आज नवी दिल्ली इथं प्रदान केले जातील. सुरेश सावंत यांच्या ‘आभाळमाया’  या कवितासंग्रहाला हा पुरस्कार मिळणार आहे.

मुंबईत  राजभवन इथं  राज्यपालांचे सचिव, अधिकारी आणि कर्मचारी यांनीही पंडित नेहरु यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

रत्नागिरी आणि धुळे जिल्हाधिकारी कार्यालायात नेहरुंच्या प्रतिमेला पुष्पहार अरपण करण्यात आला.

<><><><><>

वित्तीय समावेशन आणि सामाजिक सुरक्षा योजनांच्या राष्ट्रव्यापी अंमलबाजवणी अभियानात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे, अशी माहिती या अभियानासंदर्भातल्या अंतिम प्रगती अहवालात देण्यात आली आहे.  या अभियानाच्या काळात महाराष्ट्रात सुमारे १ कोटी ४० लाख लाभार्थ्यांपर्यंत विविध सरकारी योजनांचे लाभ पोहचवण्यात आले. या यादीत उत्तर प्रदेश प्रथम तर राजस्थान दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

वित्तीय समावेशन आणि सामाजिक सुरक्षा योजनांची माहिती सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशानं १ जुलै ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत हे अभियान चालवण्यात

आलं. अभियान काळात देशभरात प्रधानमंत्री जनधन योजनेत ६ लाखाहून अधिक खाती उघडण्यात आली, तर अटल निवृत्ती वेतन योजनेत सुमारे २ लाख नवे लाभार्थी जोडले गेले, अशी माहिती या अहवालात देण्यात आली आहे.

<><><><><>

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर ऑक्टोबर महिन्यात १ पूर्णांक २१ शतांश टक्क्यांपर्यंत घसरला. सप्टेंबर महिन्याच्या तुलनेत त्यात १३ शतांश टक्क्यांची घट झाली. गेल्या महिन्यात अन्नपदार्थ, नैसर्गिक वायू, वीज, खनिज तेल आणि धातू उत्पादनाच्या किमतीत घट झाल्यामुळे महागाईचा दर वाढल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे.

<><><><><>

मुंबई विमानतळावर सीमा शुल्क विभागानं १२ कोटींपेक्षा जास्त किमतीचे अंमली पदार्थ, १ कोटींहून अधिक रुपयांचं सोनं आणि १३ लाखांहून अधिक रुपयांचं परकीय चलन जप्त केलं आहे. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकहून आलेल्या वेगवेगळ्या प्रवाश्यांकडून १० ते १२ नोव्हेंबर दरम्यान सहा वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये हा माल जप्त करण्यात आला आहे.

<><><><><>

कोलकाता इथं इडन गार्डनमध्ये आज सुरु झालेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव १५९ धावात गुंडाळला.

दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र त्यांचे फलंदाज चांगली कामगिरी करु शकले नाहीत. एडन मारक्रमच्या ३१ धावा ही त्यांची सर्वोच्च वैयक्तिक खेळी ठरली. भारतातर्फे जसप्रीत बुमराहनं अवघ्या २७ धावा देत ५ बळी घेतले. महमंद सिराज आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी दोन तर अक्षर पटेलनं एक गडी बाद केला.

<><><><><>

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आजपासून ४४ वा भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा सुरू होत आहे. यंदाचा हा व्यापार मेळा, 'एक भारत श्रेष्ठ भारत' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान, झारखंड आणि बिहार ही राज्यं मेळ्यात

सहभागी होत आहेत. युएई, चीन, इराण, दक्षिण कोरिया आणि इजिप्तसह १२ देशांचा, या १४ दिवस चालणाऱ्या व्यापार मेळ्यात सहभाग आहे.

महाराष्ट्राच्या दालनाचं उद्घाटन उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><>

ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल यांचं आज मुंबईतल्या त्यांच्या घरी वार्धक्याने निधन झालं. त्या ९८ वर्षांच्या होत्या. २४ फेब्रुवारी १९२७ रोजी लाहौर इथे जन्मलेल्या कामिनी कौशल यांनी १९४६मध्ये नीचा नगर या चित्रपटापासून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. हा चित्रपट कान चित्रपट महोत्सवात त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला होता. दो भाई, नदिया के पार, जिद्दी, पारस, आदर्श, आरजू, झांझर, आबरू, जेलर, नाईट क्लब हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. २०२२मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘लाल सिंग चढ्ढा’ तसंच, २०१९मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘कबीर सिंग’ या चित्रपटांमध्येही त्या झळकल्या होत्या. कौशल यांच्या निधनामुळे हिंदी चित्रपटसृष्टीतल्या एका युगाचा अंत झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

//<><><><><>//